Email-edu.palghar@gmail.com

| जाक्र.पाजिप/शिक्षण/प्राथ/आस्था-२/वशी-२८७/२०२६/556 | दिनांक- १६/०४/२०२६ |
|---|---|

प्रति,

**गटशिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती सर्व**

**विषय** :-मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने मराठी,उर्दू,हिंदी व गुजराती माध्यमाच्या शाळांवरील सेवाजेष्ठतेनुसार TET/CTET परिक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांची एकत्रित तात्पुरती यादी प्रसिध्द करणेबाबत....

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) अधिनियम १९६७
२. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिद.०७/०५/२०२१
३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.२०/०४/२०२१
४.मा.अवर सचिव महाराष्ट शासन यांचेकडिल पत्र क्रमांक:संकीर्ण २०२५/प्र.क्र.-७९१/टीएनटी-१ दि.१९ जानेवारी २०२३
५.मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट राज्य पुणे-१ यांचेकडिल जाक्र.प्राशिस/टे-३०१/२०२६/१७१२९११ दि.०९/०२/२०२६
६.या कार्यालयाचे पत्र जाक्र.पाजिप /शिक्षण/प्राथ/आस्था-२/वशी/२८ /२०२६ दि.२४/०२/२०२६ व ०१/०४/२०२६
७.आपल्या कार्यालयाकडिल प्राप्त माहिती.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ ते ३ मधील पदोन्नती संदर्भातील तरतुदींनुसार व संदर्भ क्रमांक ४ व ५ अन्वये जिल्हा परिषद शाळांमधील प्राथमिक शिक्षकांना विस्तार अधिकारी शिक्षण,केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षकांच्या पदोन्नकरिता TET/CTET परिक्षा उतीर्ण होणे अनिवार्य करण्यात आलेले असल्याने जिल्हा परिषद पालघर अंतर्गत कार्यरत असणा-या TET/CTET परिक्षा उतीर्ण झालेल्या प्राथमिक शिक्षक व पदवीधर शिक्षक यांची संदर्भ क्रमांक ६ अन्वये विहित नमुन्यात माहिती व परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयात सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.त्यानुसार संदर्भ ७ अन्वये सर्व तालुकास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहिती नुसार मुख्याध्यापक पदावर तात्पुरती पदोन्नती देणेकरिता तात्पुरती सेवाजेष्ठता यादी तयार करुन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदरची यादी तालुकास्तरावर प्रसिध्द करुन संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देण्यात येवुन त्याची दिनांकित पोहोच आपल्या कार्यालयाच्या दप्तरी ठेवण्यात यावी. तसेच सदरच्या यादीवर सेवाजेष्ठतेबाबत हरकती असल्यास दिनांक २४ /०४/२०२६ पर्यंत हरकती विहीत नमुन्यात गटशिक्षणाधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आवश्यक त्या पुराव्यासह या कार्यालयास सादर करण्यात याव्यात.

विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**हरकतीकरिता विहित नमुना**

| अ. क्र. | तालुका | कर्मचा-याचे नाव | पदनाम | कर्मचारी यांनी घेतलेली हरकत | हरकतीबाबत कर्मचारी यांनी सादर केलेले पुरावे | तालुकास्तरावर हरकत मान्य/अमान्य याबाबत गशिअ यांचा स्वयंस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**सोबत** :- सेवाजेष्ठता यादी (मराठी,हिंदी,गुजराती व उर्दु माध्यम)

**(मनोज रानडे,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**